सकाळ

ठळक बातम्या

# अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाची तयारी सुरू

मुंबई, ता. २९ - अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १४ व्या द्वैवार्षिक अधिवेशनाचे वारे आताच वाहू लागले आहेत. हे अधिवेशन २ ते ५ जुलै २००९ या कालावधीत फिलाडेल्फिया येथे भरणार आहे. ....
अमेरिकास्थित मंदार जोगळेकर, किरण जोगळेकर आणि डॉ. अनिल नेरूरकर यांनी या अधिवेशनाच्या पूर्वतयारीविषयी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

हे अधिवेशन लक्षणीय आणि अविस्मरणीय व्हावे यासाठी त्या तिघांनी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रातील रंगकर्मींना कार्यक्रम सादर करण्यासाठी या अधिवेशनात सुवर्णसंधी मिळणार आहे. नव्यांना संधी देण्याचा त्यांचा मानस आहे. त्यासाठी कार्यक्रम समिती स्थापन झालेली असून रंगकर्मींनी आपले प्रस्ताव त्या समितीकडे प्रस्ताव पाठवायचे आहेत. त्यासाठी त्यांनी www.bmm२००९ philadelphia.org. या संकेतस्थळाचे प्रकाशन केले आहे.

फिलाडेल्फिया येथील अधिवेशनासाठी ४०० ते पाच हजार स्टॉल्स ९० हजार चौरसफुटांत उभारले जाणार असून, ते दालन वातानुकूलीत असेल. तसेच यानिमित्त ट्रेड फेअरचे आयोजनही करण्यात आले आहे. उद्योजकांसाठी उद्यम परिषद व डॉक्टरांसाठी वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, समितीस सुमारे ६०० उद्योजक, डॉक्टर भारतातून येणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र, गोव्यामधून एक हजार जण या अधिवेशनास उपस्थित राहणार आहेत. तसेच उत्तर अमेरिकेतून अंदाजे पाच हजारांची उपस्थिती असेल.

फिलाडेल्फियातील सात वेगवेगळ्या सभागृहांमध्ये एकूण चार दिवसांत ६० ते १०० विविध कार्यक्रम होणार असल्याने भारूड, लोकनाट्य, नाट्यसंगीत, एकपात्री

प्रयोग इत्यादी कार्यक्रमांची जास्त मागणी असेल. अमेरिकेचा व्हिसा मिळण्यास सध्या अडचणी असल्यामुळे अधिवेशनाला जाण्यासाठी समितीने मुंबई आणि पुणे येथे कार्यालये उभारलेली आहेत. महाराष्ट्र, गोवा येथील रसिकांसाठी ट्रेड फेअर एक्स्पो स्टॉल्स बुकिंग, व्हिसा, यासाठी मुंबई, पुणे कार्यालयाशी संपर्क साधता येईल. तसेच ट्रॅव्हल कंपन्यांतर्फे फिलाडेल्फिया अधिवेशनासाठी टूर पॅकेजची आखणी केली आहे.

अधिक माहितीसाठी www.bmm २००९philadelphia.org या संकेतस्थळावर किंवा किरण जोगळेकर ९८२०८२५६७०, मंदार जोगळेकर ९८८११२४३४१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. मुंबई आणि पुणे या ठिकाणी अधिवेशनासाठी उभारलेल्या कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

"BMM२००९'
c/o नंदिता आणि प्रदीप पालशेतकर,
५३४, मुंबई म्युच्युअल टेरेस,
ऑपेरा हाऊस, मुंबई-४००००७- ९१-२०-२५४१०२२६
आणि
"BMM२००९'
c/o धनंजय दातार,
६, सावली, सहवास सोसायटी नं.१,
कर्वेनगर, पुणे ४११०५२.
दूरध्वनी - ९१-२०-२५४१०२२६